**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**तहकुब सभा परिपत्र**

महिला व बाल कल्याण समितीची तहकुब झालेली सभा ( बुधवार,दिनांक १२/१२/२०१८ रोजी कोरम अभावी तहकुब झालेली सभा) बुधवार,दिनांक २६/१२/२०१८ रोजी दुपारी ३=२५ (तीन वाजून पंचवीस मिनिटे ) वाजता महात्मा ज्योतीबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

**सदर सभेत कार्यपत्रिका क्र.१९ ,दि. १२/१२/२०१८ वरील विषय क्र. १११ ते ११३ चा विचार होईल .**

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**कार्यपत्रिका क्र. २०**

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार,दिनांक २६/१२/२०१८ रोजी दुपारी ३=३० (साडे तीन ) वाजता महात्मा ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**विषय क्र. ११४**

**मा. ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि.१३/१२/२०१८ चे पत्र .**

महाराष्ट्र शासनाकडून महिला सक्षमीकरणाच्या हेतूने पुणे महानगरपालिकेत नागर वस्ती विभाग कार्यरत झाला असून त्याअंतर्गत महिला बचतगट स्थापन झाले होते.महिला बचतगटमध्ये गोरगरीब व गरजू महिला एकत्रपणे काम करुन सक्षम होण्याचा प्रयत्न करत असतात.याचाच एक भाग म्हणुन पुणे महानगरपालिकेकडून महापौर बाजार दरवर्षी दिवाळी दरम्यान भरविला जातो. यामध्ये महिला बचतगटातील महिला विविध वस्तू तयार करुन विक्री करतात.सामान्य नागरिकांना यामध्ये विविध वस्तू अत्यल्प दरामध्ये मिळतात.परंतू हा बचत बाजार वर्षातून एकदाच येतो.महिला बचतगटातील महिलांचे कुटुंब संपूर्णपणे यावर अवलंबून असते.सबब महिला बचतगटांना सक्षम करण्याच्या हेतून व सामान्य नागरिकांना अत्यल्प दरात विविध वस्तु मिळणेकामी महापौर बचत बाजार हा वर्षातून चार वेळा म्हणजेच दर ३ महिन्यांनी भरविण्यात यावा.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**